पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०१/१०/२०२०

# जिल्हा परिषद गडचिरोली येथील शासकिय रक्कमेच्या अपहार प्रकरणातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांच्या ताब्यात

❖ **मोठा गुन्हा उघड करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश**

जिल्हा परिषद गडचिरोली चे नावाने युनियन बँक शाखा गडचिरोली येथे असलेल्या बचत खात्यावरील रक्कमांचा अपहार करण्याकरीता संबंधीत प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या व कार्यलयीन शिक्के मारुन बनावट चेक तयार करुन आर.टि.जी.एस.(R.T.G.S.) चे माध्यमातुन शासनाचे खात्यामधील २,८६,१३,८५१/- रुपये बनावट बँक खात्यावर वळती करुन अज्ञात आरोपीतांनी शासकीय रक्कमेचा अपहार केला अशा मजकुराचे फिर्यादीचे फिर्याद वरुन दिनांक १९/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशन गडचिरोली (महाराष्ट्र) येथे अप. क्र. ४५८/२०१९ कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७२, ४०९, २०१, १२० (ब) ३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद असुन सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथे तपासावर आहे.

सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान या पुर्वी विविध ठिकाणाहुन १२ आरोपीतांना अटक कुन त्यांचे कडुन अपहारीत प्रकाणातील मोठी रक्कम तसेच त्या रक्कमेतुन खरेदी केलेले दाग-दागीने व गुन्ह्यात वापरण्यात आलेली वाहने पोलीसांनी जप्त केले आहे. सदर ह्या गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार आरोपी स्नेहदिप सोनी यांच्या मुख्य सहकारी देवेंद्र वैद्य यास अटक करण्यात आली असुन, मा. न्यायालयाने नमुद आरोपीचा दिनांक ०६/१०/२०२० पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.

**मा. पोलीस अधीक्षक, श्री अंकित गोयल सा़ो. तसेच** मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. मनिष कलवानिया सा़ो. यांच्या मार्गदर्शनात तपासी अधिकारी तथा स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोनि उल्हास भुसारी यांनी व त्यांच्या संपुर्ण टिमने गुन्हा दाखल झाल्यापासुन तो उघडकीस आणण्याकरीता घेतलेली मेहनत, तांत्रीक पुरावा जमा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळेच गडचिरोली पोलीस दलाला आरोपी गजाआड करण्यात यश प्राप्त झाल्याचे सांगुन संपुर्ण तपास पथकाचे कौतुक व अभिनंदन केले आहे.